From the house of
HOME CABLE
HOME NET

# होम टाइम्स

मराठी

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 28 | Saturday, 7th Oct 2023 to 13th Oct 2023 | Price Rs 3/-

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

# मुलुंड रेल्वे स्थानकावर तीन नवीन एस्केलेटर सुविधा सुरु

## खासदार कोटक यांच्या हस्ते झाले उद्घाटन

सविस्तर वृत्त पान
(पान २ वर)





Volume : IX | Issue : 28 होम टाइम्स

# टोल दरवाढीविरोधात मनसे कार्यकर्त्यांनी केले आंदोलन

■ **होम टाइम्स टीम**

१ ऑक्टोबरपासून टोल दरात वाढ करण्याच्या प्रशासनाच्या निर्णयाविरोधात शनिवारी आणि सोमवारी मुलुंडसह ठाण्यात विविध ठिकाणी मनसे कार्यकर्त्यांनी निदर्शने केली. येत्या काही दिवसांत टोल कमी न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मनसेने दिला आहे.

१ ऑक्टोबरपासून मुंबईतील प्रवेश द्वारांवर असलेल्या पाचही टोल नाक्यांचे दर वाढवण्यात आले आहेत. त्या विरोधात मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले असून शनिवारी त्यांनी मुलुंड पूर्व आनंद नगर टोल नाक्यावर आंदोलन केले. मनसे कार्यकर्त्यांनी हातात झेंडे आणि बॅनर घेऊन ४ किलोमीटरहून अधिक लांब मानवी साखळी तयार केली. कार्यकर्त्यांनी हे आंदोलन शांततेत पार केले. या आंदोलनात मनसे कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली होती. या आंदोलनानंतर ३० रोजी म्हणजेच शनिवारी २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीनिमित्त मनसे कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा गांधीगिरी करत आंदोलन केले. या आंदोलनात गांधीजींची वेशभूषा केलेले आंदोलनकर्ते टोलच्या वाढत्या किमतींविरोधात आवाज उठताना दिसले. यादरम्यान परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. येत्या काही दिवसांत टोलभाव वाढ कमी न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसे कार्यकर्त्यांनी दिला.

# मुंबई महापालिकेने उचलला रेबीजमुक्तीचा विडा

## क्यूआर कोड लावून दिली जातेय रेबीजची लस




■ **होम टाइम्स टीम**

मुंबई रेबीजमुक्त करण्यासाठी राज्यात प्रथमच मुंबई महापालिकेने क्यूआर कोड बसवून नवीन मोहीम सुरू केली आहे. त्यामुळे कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित कुत्र्याला दिलेल्या रेबीज लसीची संपूर्ण माहिती व इतर सर्व माहिती मोबाईल फोनवर उपलब्ध होणार आहे.

मुंबई रेबीजमुक्त करण्यासाठी मुंबई महापालिकेकडून रोज नवनवे उपक्रम सुरू आहेत. आता रस्त्यावरील १५ हजार कुत्र्यांचे लसीकरण केले जाणार आहे. मुंबई महानगरपालिका आणि इतर सामाजिक कार्यकर्ते हे काम करणार आहेत. ही मोहीम २९ सप्टेंबरपासून सुरू झाली असून १० ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर, ६ दिवसांत मुंबईत ८५०० हून अधिक रस्त्यावरील कुत्र्यांना रेबीजची लस देण्यात आली आहे, तर मुलुंड पूर्व आणि पश्चिम भागात १०११ कुत्रे आणि ३५८ मांजरी अशा एकूण १३६९ प्राण्यांना ही लस देण्यात आली आहे. ही मोहीम पी उत्तर, पी दक्षिण, आर मध्य, आर उत्तर, एस विभाग आणि टी विभागात सुरू करण्यात आली आहे. या कामासाठी मुंबई महापालिकेच्या शंभरहून अधिक कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. रस्त्यावरील कुत्र्यांच्या गळ्यात क्यूआर कोडही लावला जात आहे. त्यामुळे हा क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर नागरिकांना त्याला खाऊ घालणे आणि त्याची काळजी घेणे याबाबत संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. हा कुत्रा कधी एखाद्या घटनेचा बळी ठरला तर हा कोड स्कॅन करून संबंधित फीडरला माहिती देता येईल. यासोबतच त्या कुत्र्याला रेबीजची लस कधी दिली आहे, याचीही माहिती त्या कोडद्वारे उपलब्ध होणार आहे. राज्यात प्रथमच अशा प्रकारची योजना मुंबई महापालिकेने सुरू केली असून, या योजनेला मिळालेल्या प्रतिसादानंतर आगामी काळात मोठ्या प्रमाणावर रेबीज निर्मूलनाची मोहीम सुरू करण्यात येणार आहे.

# मुलुंड रेल्वे स्थानकावर तीन नवीन एस्केलेटर सुविधा सुरू

(पान १ वरून)



■ **होम टाइम्स टीम**

ईशान्य मुंबईचे खासदार मनोज कोटक यांच्या हस्ते रविवारी मुलुंड रेल्वे स्थानकावर तीन नवीन एस्केलेटर सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे आता स्थानकांवर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग नागरिकांचा प्रवास सुलभ झाला आहे.

एल्फिन्स्टन रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर रेल्वे प्रशासनाने गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व रेल्वे स्थानकांवर एस्केलेटरची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला होता. या पार्श्वभूमीवर मुलुंड रेल्वे स्थानकावर तीन नवीन एस्केलेटर बनवण्याच्या कामालाही सुरुवात करण्यात आली होती. त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर रविवारी ईशान्य मुंबईचे खासदार मनोज कोटक यांच्या हस्ते नवीन एस्केलेटरचे उद्घाटन करण्यात आले. मुलुंड पूर्वेकडे एक आणि मुलुंड पश्चिमेकडे जाणाऱ्या फलाटावर दोन एस्केलेटर लावण्यात आले आहेत. यावेळी खासदार मनोज कोटक यांच्यासमवेत स्थानिक आमदारांसह भाजप कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. आकडेवारीबद्दल सांगायचे तर, मध्य रेल्वेचे १११ एस्केलेटर मुंबईच्या रेल्वे स्थानकांवर कार्यान्वित आहेत. ज्याचा थेट फायदा ज्येष्ठ नागरिकांना तसेच इतर दिव्यांग नागरिक आणि इतर लोकांना होतो. मुलुंडमध्येही सरासरी एक लाखाहून अधिक नागरिक या स्थानकाचा वापर करतात. अशा परिस्थितीत नवीन एस्केलेटर बांधल्याने मुलुंड आणि परिसरात राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# मध्य रेल्वेच्या सात स्थानकांवर महीलांसाठी पावडर रूमची व्यवस्था

# योजनेत मुलुंड स्टेशनचाही समावेश

■ होम टाइम्स टीम

येत्या दोन महिन्यांत मुलुंडसह मुंबईतील इतर सात स्थानकांवर महिलांसाठी विशेष पावडर रूम सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिथे महिलांसाठी अल्पोपहारासोबतच इतर मेकअपच्या वस्तूही महिलांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिल्या जातील.

प्रवाशांच्या सेवेसाठी मध्य रेल्वे नवीन प्रकल्पांवर काम करत आहे. मध्य रेल्वेच्या मदतीने मुंबईतील ७ रेल्वे स्थानकांवर पावडर रूम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या स्थानकांमध्ये एलटीटी, घाटकोपर, कांजूरमार्ग, मुलुंड, ठाणे, मानखुर्द आणि चेंबूर स्थानकांचा समावेश आहे. येत्या दोन महिन्यांत या स्थानकांवर महिलांसाठी पावडर रूम सुरू होणार आहेत. या ठिकाणी महिला प्रवाशांना प्रसाधनगृहाशिवाय ताजेतवाने होता येणार आहे. किरकोळ दुकानांमधून सौंदर्य उत्पादने देखील खरेदी करू शकता येणार आहेत. ही सुविधा वापरण्यासाठी महिला प्रवाशाला १० रुपये शुल्क द्यावे लागणार आहे.

### महिलांना मिळणार दिलासा

त्यांना हवे असल्यास ३६५ रुपयांमध्ये वार्षिक पासही मिळू शकतो. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार संपूर्ण भारतीय रेल्वेतील हा पहिलाच उपक्रम आहे, जिथे स्थानकांवर पावडर रूम सुरू होणार आहेत. २ महिन्यांनंतर, येत्या काही दिवसांत इतर स्थानकांवरही ही सेवा सुरू होणार आहे.

याबाबत माहिती देताना मुंबई विभागाचे वरिष्ठ डीसीएम रॉबिन कालिया म्हणाले की, प्रत्येक स्थानकावर पावडर रूम बांधण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. स्ट्रक्चर उभारण्याचे काम आणि खर्च ऑपरेटर स्वत: उचलणार असून या ऑपरेटरला ५ वर्षांचे कंत्राट देण्यात आले आहे. एवढेच नाही तर या स्थानकांसाठी रेल्वेला ३९.४८ लाख रुपये शुल्कही भरावे लागणार आहे. तसेच समोरच्या भागात चार टॉयलेट ब्लॉक असतील, तर अर्ध्या भागात रिटेल स्टोअर्स असतील. या स्टोअरमध्ये सौंदर्य उत्पादने आणि महिलांशी संबंधित इतर वस्तू देखील खरेदी करता येतील. या किरकोळ क्षेत्रात पुरुषांना जाता येणार आहे पण पुरुषांना इतर भागात जाण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# मुलुंड टी वॉर्ड आणि पोलीस ठाण्याने राबविली 'स्वच्छता ही सेवा' मोहीम










■ होम टाइम्स टीम

**महात्मा गांधी यांच्या १५४ व्या जयंतीनिमित्त मुंबईसह देशभर 'स्वच्छता ही सेवा' अंतर्गत १ तास श्रमदान करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले होते. त्या आवाहनाला देशभरात चांगला प्रतिसाद मिळाला. मुंबई महापालिकेने देखील सर्व प्रभागात ही मोहीम राबवली. मुलुंडमध्ये आठ ठिकाणी हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्ते साफ करत 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम राबविला.**

महात्मा गांधींच्या १५४ व्या जयंतीपूर्वी देशभरात 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत श्रमदान करण्यात आले. १ ऑक्टोबर म्हणजेच रविवारी सर्व नागरिकांना एक तास आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून श्रमदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या मोहिमेत मुंबई महानगरपालिकेनेही सहभाग घेतला. संपूर्ण मुंबईत ही योजना राबवली. मुलुंडबद्दल बोलायचे तर मुलुंडमध्ये एकूण आठ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये स्वप्ना नगरी, मेहुल सर्कल, लोकमान्य टिळक मार्ग मुलुंड पूर्व आणि गरुड सहकारी गृहनिर्माण संस्था मुलुंड पूर्व इत्यादी भागांचा समावेश होता. मुंबई महापालिकेच्या टी वॉर्ड अधिकाऱ्यांसह लायन्स क्लब ऑफ मुलुंडच्या लायन लेडी ऑक्झिलरी आणि शाळेतील मुले मुलले, इतर नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मिळून रस्ते स्वच्छ केले.

यासोबतच मुलुंड पोलीस ठाण्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या ठिकाणी परिमंडळ ७चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड व मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे यांच्यासह इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी, सामाजिक कार्यकर्त्यांनी मिळून पोलीस स्टेशन परिसर व इतर ठिकाणी स्वच्छता केली.

## संपादकीय ■ हेमांशू कोठारी

# मुलुंडकर अतिक्रमणमुक्त कधी होणार?

मुंबई आणि उपनगरात स्टेशन परिसरात फेरीवाल्यांचे अतिक्रमण वाढत आहे. मुंबईसारख्या मोठ्या शहरात फेरीवाल्यांची समस्या कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. मुंबईच्या उपनगरात नीट नजर टाकली तर प्रत्येक कोपऱ्यात फेरीवाले बॅगा घेऊन बसलेले दिसतात. प्रत्येक रस्त्यावर हे दृश्य आहे. एका मार्गावर १० ते १५ फेरीवाले आणि आजूबाजूला खरेदी करणाऱ्या नागरिकांची गर्दी. हे सर्व मुंबईत नित्याचे झाले आहे. महापालिकेने काही नियम आणि कायदे केले आहेत पण ते कितपत पाळले जातात हे आपल्या सर्वांना माहीत आहे. मुंबई महापालिकेने फेरीवाल्यांना स्टेशन परिसराच्या १५० मीटर परिसरात बसण्यास मनाई केली आहे. मात्र तरीही फेरीवाले तिथेच बस्तान घेऊन बसतात. मुलुंडच्या आरआरटी रोडबद्दल बोलायचे झाले तर दोन्ही बाजूला फेरीवाल्यांचा जमाव आहे. हा नियम कोरोनापूर्वी लागू करण्यात आला होता. मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यांच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी महापालिकेची असली तरी मुलुंड टी वॉर्डमध्ये अशी अनेक कारणे आहेत की सन २०१९ पासून ते अवैध फेरीवाल्यांवर कारवाई करू शकलेले नाहीत. आधी कोरोनाचे कारण, मग कमी मनुष्यबळाचे कारण आणि आता दुसरे कारण. या सर्व गोष्टींचा गैरफायदा फेरीवाले घेत असून आरआरटी रस्त्यावर अतिक्रमण वाढत आहे. आता बेस्टच्या बसेसही या रस्त्यावरून जाऊ लागल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालण्यासाठी जागाच उरलेली नाही. फूटपाथ आणि लगतच्या रस्त्यांवर फेरीवाल्यांनी कुठे जावे आणि पादचाऱ्यांनी कुठे जावे, असा प्रश्न मुलुंडकरांना सतावू लागला आहे. मुलुंडच्या इतर रस्त्यांबद्दल बोलायचे झाले तर आरआरटी रोड तसेच व्हीपी रोड, देवीदयाल रोड, एमजी रोड, जेएस डोसा रोडची अवस्थाही तशीच आहे. या मार्गांवर अनेक फेरीवाले आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल पाहायला मिळतात. त्यांच्यावर महापालिकेकडून अनेकदा कारवाई केली जाते, मात्र तरीही ते या रस्त्यावरच स्टॉल लावून बसतात. त्यांना योग्य जागा दिली जात नाही, त्यामुळे ते रस्त्याच्या कडेला, पदपथांवर कब्जा करत राहतात, फेरीवाल्यांच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे अधिकारी गांभीर्याने का घेत नाहीत? परवानाधारक असो की विना परवाना फेरीवाले असोत, सर्वच मनमानी पद्धतीने व्यवसाय करत आहेत. महापालिकेची गाडी आठवड्यातून एक-दोनदा येते. अधिकाऱ्यांकडून अतिक्रमण दूर केले जाते मात्र दुसऱ्या दिवशीही समस्या कायम राहते. या अतिक्रमणाचा फायदा घेऊन बेशिस्त घटक चोरी, फसवणूक करताना दिसतात. मुलुंडच्या मुख्य बाजारपेठेत पिक-पॉकेटिंग किंवा चेन स्नॅचिंगच्या घटना दररोज घडत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनता आता बाजारपेठेतही सुरक्षित राहिलेली नाही, हे स्पष्टपणे दिसून येत आहे. लोकांना रस्त्यावर चालण्यासाठी अधिकाधिक मोकळी जागा मिळाल्यास चोरट्यांना चोऱ्या करता येणार नाहीत. मात्र फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे सणासुदीच्या काळात रस्ते एवढ्या गजबजून जातात की चोरट्यांनी त्याचा फायदा उठवत महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने, पर्समधील पैशांची चोरी, मोबाईल चोरी आदी प्रकार वाढू लागले आहेत. प्रशासनाने कायदेशीर आणि बेकायदेशीर फेरीवाल्यांचे वर्गीकरण करून त्यांना जागा दिल्यास फेरीवाल्यांची संख्याही कमी होईल आणि फूटपाथही नागरिकांसाठी चालण्यायोग्य राहतील. मात्र महापालिकेने कोणतेही काम वेळेपूर्वी केले तर हरकत नाही, असा निर्णय घेतला आहे. मोठी दुर्घटना झाल्याशिवाय किंवा लोक रस्त्यावर उतरल्याशिवाय किंवा आंदोलन केल्याशिवाय महापालिकेला जाग येणार नाही.

# मुलुंडमधील भाषिक वादावरून उपनिबंधक कार्यालयाने काढले परिपत्रक

## खासदार कोटक आणि आमदार कोटेचा यांनी घेतली होती गंभीर दखल

■ *होम टाइम्स टीम*

***मुलुंडमध्ये व्यवसायी गाळा देण्याच्या वादावरून भाषिक वाद निर्माण झाल्याने राज्यभरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. सर्व स्तरातून यावर टीका केली जात होती. खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहिर कोटेचा यांनीही या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन भविष्यात पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी उपनिबंधक कार्यालयांना पत्र पाठवून याबाबत गंभीर दखल घेण्याची मागणी केली होती. त्यावर उपनिबंधक कार्यालयाने सर्व सोसायट्यांना परिपत्रक काढून याबाबत खबरदारी घेण्याचे आदेश दिले आहे.***

*मुलुंडच्या शिवसदन सोसायटीमध्ये काही दिवसांपूर्वी मराठी महिलेला कार्यालय नाकारल्या नंतर मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. याबाबत महिलेने सोशल मीडियावर पोस्ट करून मराठी मुद्द्यांवर राजकारण करणाऱ्यांकडून मदत मागितली होती. सर्वसामान्य नागरिकांमध्ये देखील या भाषिक वादाबाबत असंतोष पसरलेला पाहायला मिळत होता. उद्योग मंत्री उदय सामंत, भाजप नेत्या चित्रा वाघ, प्रसाद लाड तसेच स्थानीय खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहीर कोटेचा*

*यांनी या महिलेची भेट घेऊन सदर महिलेला सरकार पाठीशी असल्या संदर्भात विश्वास दिला होता. त्यानंतर अखेर आता खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहीर कोटचा यांनी पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी उपनिबंधक कार्यालयाला पत्र लिहिले होते. उपनिबंधक कार्यालयाकडून सोसायट्यांना अशा आशयाचे परिपत्रक काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर उपनिबंधक कार्यालयाने मंगळवारी मोठी कारवाई करत उपनिबंधक कार्यालयाला कडून पत्रक जारी करण्यात आले. या पत्रकात जात, धर्म, वंश, लिंग आणि भाषेवरून कुठल्याही नागरिकाला सदनिका नाकारता येणार नाही, अशा प्रकारचे कृत्य कोणी केले तर त्याची जबाबदारी सोसायटी पदाधिकाऱ्यांची असणार आहे. अशा घटनेनंतर पदाधिकाऱ्यांना कारवाईचा सामना करावा लागणार आहे. अशा आशयाचे पत्र उपनिबंधक कार्यालयाने सर्व गृहनिर्माण सोसायट्यांना पाठवले आहे. त्यामुळे आता भविष्यात अशा घटना घडणार नाहीत असा विश्वास लोक प्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.*

# पाणी कपातीची चिंता नाही

■ होम टाइम्स टीम

काही दिवसांमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये मुबलक पाणीसाठा जमा झाल्याने पुढील मान्सूनपर्यंत पाणीकपात होण्याची शक्यता जवळपास संपुष्टात आली आहे. पुढील चार दिवसांमध्ये मुंबई आणि शेजारी जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे तलावांच्या पाणलोट क्षेत्रात आणखी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मुंबई आणि उपनगरांना अप्पर वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी या सात तलावांमधून पाणीपुरवठा केला जातो. यातील भातसासह मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा व अप्पर वैतरणा या तलावांमधून सर्वाधिक पाणीपुरवठा केला जातो. सात तलावांमध्ये १ ऑक्टोबर रोजी ९९.१८ टक्के पाणीसाठा होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा पाणीसाठा ०.६१ टक्क्यांनी जास्त आहे. त्यामुळे पुढील मान्सूनपर्यंत पाणीकपात होण्याची शक्यता जवळपास मिटली आहे.

## परतीच्या पावसाने जलाशयांना दिला आधार

**पाणीसाठा व पाणी साठवण्याची क्षमता**

| तलाव | सध्याचा साठा | क्षमता |
|---|---|---|
| ● अप्परवैतरणा | २,२५,६०१ | २,२७,०४६ |
| ● मोडक सागर | १,२८,९१० | १,२८,९२५ |
| ● तानसा | १,४३,५३४ | १,४५,०८० |
| ● मध्य वैतरणा | १,९२,०४० | १,९३,५३० |
| ● भातसा | ७,०९,६३० | ७,१७,०३७ |
| ● विहार | २७,६९८ | २७,६९८ |
| ● तुळशी | ८०४६ | ८,०४६ |

मुंबईत साधारणपणे जून महिन्यात पावसाला सुरवात होते. परंतु, यंदा जून महिन्यात पावसाने दडी मारली होती. त्यामुळे तलावांमधील पाणीसाठा प्रचंड खाली आला होता. पुढील काही महिन्यांमध्ये पाऊस आला नाही तर शहरे आणि उपनगरांना मोठ्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागेल अशी शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे बचावात्मक उपाय म्हणून १ जुलैपासून दहा टक्के पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात समाधानकारक पाऊस झाला. यासंदर्भात माहिती देताना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, की तलावांमधील पाणीसाठा सर्वोच्च पातळीवर पोहोचला आहे. त्यामुळे पुढील मान्सूनपर्यंत पाणीकपात होण्याची शक्यता मावळली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाणीसाठा ९५ टक्क्यांवर होता. त्यामुळे या वर्षीच्या मान्सूनपर्यंत पाणीकपात लागू करण्यात आली नव्हती. परंतु, यंदा मान्सूनचे उशीरा आगमन झाले. बचावात्मक उपाय म्हणून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली. यंदा दमदार पाऊस झाला आहे. तलावही भरले आहेत. त्यामुळे पाणीकपात लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचेही ते म्हणाले.

# गणेश चतुर्थीच्या १० दिवसांच्या उत्सवात १० मोबाईल गेले चोरीला

■ होम टाइम्स टीम

**महिनाभरात मुलुंड पोलीस ठाण्यात २२ मोबाईल फोन चोरीच्या घटनांची नोंद झाली आहे, तर १० दिवस चालणाऱ्या गणेश उत्सवात १० मोबाईल चोरीचे गुन्हे दाखल झाले आहेत. हे पाहता आगामी सणासुदीत नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, असे आवाहन मुलुंड पोलिसांनी केले आहे.**

## एका महिन्यात २२ मोबाईल चोरीच्या घटना उघड




## आगामी उत्सवाबाबत नागरिकांनी दक्षता घेण्याचे पोलिसांकडून आवाहन

मुलुंडसह मुंबईतील गर्दीचा फायदा घेत असामाजिक तत्त्वे अनेकदा नागरिकांचे मोबाईल फोन आणि इतर मौल्यवान वस्तू चोरतात. गणपती सणाच्या निमित्ताने अशा अनेक घटना यापूर्वी उघडकीस आल्या आहेत. एकीकडे या समाजकंटकांवर मुसक्या आवळण्यासाठी मुंबई पोलीस रोज नवनवीन मोहीम राबवत आहेत, तर दुसरीकडे मुंबई पोलिसही नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करत आहेत. आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर या कालावधीत मुलुंड पश्चिम भागात मोबाईल चोरीच्या २२ घटना घडल्या आहेत. यातील चार गुन्ह्यांमध्ये आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र तरीही समाजकंटकांनी गर्दीचा फायदा घेऊन नागरिकांचे मोबाईल चोरल्याचे १८ गुन्हे उघडकीस आले असून पोलिसांनी या आरोपींचा शोध सुरू केला आहे. या २२ पैकी

> *गर्दीच्या ठिकाणी जाण्यापूर्वी, आपल्या मौल्यवान वस्तू तपासा आणि या ठिकाणांमधून जात असताना आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींवर लक्ष ठेवा. एवढेच नाही तर गरज असल्याशिवाय मौल्यवान वस्तू घराबाहेर काढू नका आणि मोबाईल फोन आणि पर्सकडे विशेष लक्ष द्या.*
>
> *– कांतीलाल कोथिंबिरे,*
> *वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुलुंड पोलीस स्टेशन*

गणपती उत्सवादरम्यान एकूण १० मोबाईल चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. गणपती उत्सवानंतर आता दसरा, नवरात्री हे सणही काही दिवसांत सुरू होणार आहेत. याबाबत मुलुंड पोलिसांनी नागरिकांनी सावध राहून आपल्या मौल्यवान वस्तूंचे संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांना घराबाहेर काढल्यानंतर वेळोवेळी मौल्यवान वस्तू तपासत राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या बोलण्याने प्रभावित होऊ नका आणि गर्दीच्या ठिकाणी सोन्याचे दागिने काढून बॅगेत ठेवाव, जेणेकरुन असामाजिक तत्वांनी तुमचे नुकसान होणार नाही.

# मुलुंडमधील भाषिक वादावरून उपनिबंधक कार्यालयाने काढले परिपत्रक

## खासदार कोटक आणि आमदार कोटेचा यांनी घेतली होती गंभीर दखल

■ होम टाइम्स टीम

मुलुंडमध्ये व्यवसायी गाळा देण्याच्या वादावरून भाषिक वाद निर्माण झाल्याने राज्यभरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. सर्व स्तरातून यावर टीका केली जात होती. खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहिर कोटेचा यांनीही या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन भविष्यात पुन्हा असे प्रकार घडू नयेत यासाठी उपनिबंधक कार्यालयांना पत्र पाठवून याबाबत गंभीर दखल घेण्याची मागणी केली होती. त्यावर उपनिबंधक कार्यालयाने सर्व सोसायट्यांना परिपत्रक काढून याबाबत खबरदारी घेण्याचे आदेश दिले आहे.

मुलुंडच्या शिवसदन सोसायटीमध्ये काही दिवसांपूर्वी मराठी महिलेला कार्यालय नाकारल्या नंतर मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाला होता. याबाबत महिलेने सोशल मीडियावर पोस्ट करून मराठी मुद्द्यांवर राजकारण करणाऱ्यांकडून मदत मागितली होती. सर्वसामान्य नागरिकांमध्ये देखील या भाषिक वादाबाबत असंतोष पसरलेला पाहायला मिळत होता. उद्योग मंत्री उदय सामंत, भाजप नेत्या चित्रा वाघ, प्रसाद लाड तसेच स्थानीय खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहीर कोटेचा यांनी या महिलेची भेट घेऊन सदर महिलेला सरकार पाठीशी असल्या संदर्भात विश्वास दिला होता. त्यानंतर अखेर आता खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहीर कोटचा यांनी पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी उपनिबंधक कार्यालयाला पत्र लिहिले होते. उपनिबंधक कार्यालयाकडून सोसायट्यांना अशा आशयाचे परिपत्रक काढण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानंतर उपनिबंधक कार्यालयाने मंगळवारी मोठी कारवाई करत उपनिबंधक कार्यालयाला कडून पत्रक जारी करण्यात आले. या पत्रकात जात, धर्म, वंश, लिंग आणि भाषेवरून कुठल्याही नागरिकाला सदनिका नाकारता येणार नाही, अशा प्रकारचे कृत्य कोणी केले तर त्याची जबाबदारी सोसायटी पदाधिकाऱ्यांची असणार आहे. अशा घटनेनंतर पदाधिकाऱ्यांना कारवाईचा सामना करावा लागणार आहे. अशा आशयाचे पत्र उपनिबंधक कार्यालयाने सर्व गृहनिर्माण सोसायट्यांना पाठवले आहे. त्यामुळे आता भविष्यात अशा घटना घडणार नाहीत असा विश्वास लोक प्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.

## सरकारी आरोग्य यंत्रणेच्या विरोधात राष्ट्रवादी रस्त्यावर..

# मुलुंड पोलिसांकडून राष्ट्रवादीचे आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न

## आंदोलना पूर्वीच कार्यकर्त्यांची केली धरपकड




■ होम टाइम्स टीम

**महाराष्ट्रात विविध ठिकाणी झालेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये निष्पाप रुग्णांच्या मृत्यूमुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापलेले आहे. ठिकठिकाणी शासनाच्या विरोधात निदर्शने केली जात आहेत. राज्य सरकार शासकीय रुग्णालयांमध्ये सोयी सुविधा पुरवण्यास अपयशी ठरल्याचा ठपका ठेवत विरोधकांनी रस्त्यावर उतरून सरकारचा निषेध करत आरोग्यमंत्र्यांचा राजीनामाची मागणी केली आहे. मुलुंडमध्ये गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने रेल्वे स्थानक परिसरात आंदोलन करण्यात आले.**

महाराष्ट्रातील विविध ग्रामीण तसेच शहरी भागातील शासकीय रुग्णालयात रुग्णांचे झालेल्या मृत्यू प्रकरणी विरोधी पक्ष रस्त्यावर उतरलेले पाहायला मिळून येत आहेत. विरोधकांनी शासन रुग्णांना लागणाऱ्या औषधांपासून ते वैद्यकीय कर्मचारी पुरवण्यापर्यंत सर्वच गोष्टींमध्ये अपयशी ठरल्यामुळे नांदेड असो वा ठाणे किंवा नागपूर या ठिकाणी असलेल्या शासकीय रुग्णालयांमध्ये अनेक रुग्णांचा मृत्यू झाला आहे. याला सर्वस्वी शासन जबाबदार आहे. त्यामुळे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी विरोधकांनी केली आहे. मुलुंडमध्ये संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार) तालुका अध्यक्ष अमित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे स्टेशन परिसरात आंदोलन करण्यात आले. यासोबतच मुलुंड मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते गुरुजोत्सिंकीर यांनी रेल रोको करणार असल्याचे जाहीर करताच त्यांना मुलुंड मधील त्यांच्या घरातून ताब्यात घेण्यात आले. दुपारपर्यंत पोलिसांकडून आंदोलकांची धरपकड सुरू होती. शासन शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय सुविधा देण्यास अपुरे पडत आहेत. त्यामुळे निष्पांचा बळी घेतला जातो. त्यामुळे आपली जबाबदारी स्वीकारून सरकार बरखास्त करावे अशी मागणी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर मुलुंड रेल्वे स्थानक परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# मुलुंड येथे आयोजित ज्येष्ठ कलाकार पुरस्कार कार्यक्रमात कलाकारांचा सन्मान

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची उपस्थिती




■ होम टाइम्स टीम

***रविवारी मुलुंड पश्चिम येथे ज्येष्ठ कलाकार पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उद्योगमंत्री उदय सामंत हेही उपस्थित होते. त्यांच्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला.***

*रविवारी मुलुंड पश्चिम महाराष्ट्र सेवा संघात ज्येष्ठ कलाकार पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गेली ९ वर्षे सातत्याने या उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ संगीतकार शरद पोंक्षे यांच्यासह अन्य कलाकारांचा उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.*

*यावेळी विरोधकांकडून सुरू असलेल्या परदेश दौऱ्यावर केलेल्या टिकांना मंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले. तसेच विरोधकांसाठी चार प्रश्नही उपस्थित केले. एवढेच नाही तर सणासुदीच्या काळात लाऊडस्पीकरच्या आवाजावर राज ठाकरेंच्या ट्विटचे समर्थन करत लवकरच यावर निर्णय घेतला जाईल असे सांगितले. उचलून त्याची अंमलबजावणी करावी.*

# सीएनजी आणि पीएनजी ग्राहकांना 'अच्छे दिन'

## केंद्र सरकारकडून दरात कपात

■ **होम टाइम्स टीम**

केंद्राने देशांतर्गत उत्पादित नैसर्गिक वायूच्या किमती सुधारित केल्यानंतर सीएनजी आणि पीएनजीच्या किमती पुन्हा एकदा कमी करण्यात आल्या आहेत. वर्षभरात लागोपाठ तिसर्यांदा कपात केल्याने आता नागरिकांना त्याचा मोठा फायदा झाला आहे.

मुंबईत सीएनजी आणि घरगुती पीएनजीच्या किमती कमी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सीएनजीच्या किमती ३ रुपयांनी आणि घरगुती पीएनजीच्या किमती २ रुपयांनी कमी झाल्या आहेत. या निर्णयाने सीएनजीची नवीन किंमत ७६ रुपये प्रतिकिलो झाली असून देशांतर्गत पीएनजीची किंमत ४७ रुपये झाली आहे. केंद्राने देशांतर्गत उत्पादित नैसर्गिक वायूच्या किमती सुधारित केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. या वर्षी ७ एप्रिल रोजी सीएनजीच्या किमतीत प्रति किलो ८ रुपयांनी तर देशांतर्गत पीएनजीची किंमत ५ रुपयांनी कमी करण्यात आली होती. इतकेच नाही तर फेब्रुवारी महिन्यातही सीएनजीच्या दरात अडीच रुपयांनी कपात करण्यात आली होती. हा नवा दर १ ऑक्टोबरपासून लागू करण्यात आला आहे. वर्षभरात सलग तिसऱ्यांदा कपात केल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



# मुलुंडमधून ६० किलो गांजा जप्त, ४ आरोपींना अटक

## गुन्हे शाखा युनिट-७ ची मोठी कारवाई

■ होम टाइम्स टीम

गुन्हे शाखा परिमंडळ ७ ने केलेल्या मोठ्या कारवाईत मुलुंड येथून ६० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. हे अंमली पदार्थ बुलढाणा परिसरातून मुंबईत विक्रीसाठी आणले होते. याप्रकरणी चार आरोपींसह वाहनही जप्त करण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील गुन्हे शाखा परिमंडळ ७ ला मुलुंड येथे मोठ्या प्रमाणावर गांजा मुंबईतील इतर भागात विक्रीसाठी नेण्यात येणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी सतर्कता दाखवत मुलुंड पश्चिम बाल राजेश्वर मार्गावर चोख बंदोबस्त ठेवला. काही वेळातच त्याच परिसरात असलेल्या सार्वजनिक सेवा प्रसाधनगृहाजवळ उभ्या असलेल्या इनोव्हा वाहनाचा पोलिसांना संशय आला. पोलिसांनी गाडीजवळ जाऊन त्यामध्ये बसलेल्या लोकांची चौकशी केली असता, पोलिसांना समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने कारची झडती घेण्यात आली असता कारमध्ये ६० किलो गांजा आढळून आला, तो पोलिसांनी जप्त केला. ज्याची एकूण किंमत २४ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी भांडुपचे रहिवासी मोहसीन शेख, मोहम्मद खान आणि मुलुंडचे रहिवासी रोहित भालेराव आणि राकेश गायकवाड यांनाही गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. हे अंमली पदार्थ महाराष्ट्रातील बुलढाणा भागातून मुंबईत विक्रीसाठी आणल्याचे आरोपींनी पोलिसांना सांगितले. सध्या चारही आरोपींना गुन्हे शाखेने अटक केली असून २४ लाख रुपयांच्या अंमलीपदार्थांसह ६ लाख रुपयांची इनोव्हा कारही जप्त करण्यात आली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

---

# मुलुंडमध्ये उभे राहणार आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक स्टेडियम

■ होम टाइम्स टीम

मुलुंडच्या नागरिकांसाठी चांगली बातमी आहे. कारण लवकरच मुलुंडमध्ये ऑलिम्पिक स्टेडियम तयार केले जाणार आहे. जानेवारी २०२५ मध्ये या कामाला सुरुवात होणार असून १८ महिन्यांत ते खेळाडूंसाठी उभे राहणार आहे. मुलुंड पश्चिम कालिदास नाट्य गृहाजवळ हे स्टेडियम बांधण्यात येणार आहे. त्यासाठी ३६ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

मुलुंडसह मुंबई आणि देशभरातील तरुणांमधील ऑलिम्पिक खेळाविषयीची वाढती आवड पाहता आता मुलुंडमध्ये ऑलिम्पिक स्टेडियम बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे ऑलिम्पिक स्टेडियम मुलुंड पश्चिम कालिदास नाट्यगृहाजवळ बांधले जाणार आहे. हे स्टेडियम २४ हजार ६८२ चौरस मीटर जागेवर आंतरराष्ट्रीय स्टेडियमच्या धर्तीवर बांधले जाणार आहे. सध्या त्याच्या बांधकामाचा खर्च ३६ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचे बांधकाम जानेवारी २०२४ मध्ये सुरू होईल आणि हा प्रकल्प १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. एवढेच नाही तर ५६० पेक्षा जास्त लोक बसण्याची क्षमता असलेले मॉड्युलर ग्रँडस्टँड देखील येथे विकसित केले जाणार आहे. यावर महापालिकेच्या उद्यान विभागाचे उपायुक्त किशोर गांधी म्हणाले की, सध्या मुंबईत तशी सुविधा नाही. त्यामुळे नागरिकांना सेवा देण्यासाठी हे स्टेडियम बांधण्याच्या योजनेवर मुंबई महापालिका काम करत आहे. हे स्टेडियम आंतरराष्ट्रीय स्तरावर बांधले जाणार आहे. त्याचा लाभ आता मुलुंड आणि परिसरात राहणाऱ्या नागरिकांना आणि ऑलिम्पिक क्रीडाप्रेमींना मिळणार आहे.

**३६ कोटींच्या खर्चाला मिळाली मंजुरी**

---

# मुलुंडच्या भाजीपाला बाजारात होतेय पाकीटमारी

## महिलेच्या बॅगेतील ७० हजारांच्या सोनसाखळीची केली चोरी

■ होम टाइम्स टीम

मुलुंडच्या आरआरटी रोडवर पाकीटमारांचा सुळसुळाट झाल्याचे दिसून येत आहे. या परिसरात भाजीपाला खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांना हे पाकीटमार टार्गेट करत आहेत. काही दिवसांपूर्वी एका महिलेची बॅग कापून त्यामधील पाकिटातील ७० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैन लांबविण्यात आली होती.

मुलुंडमध्ये राहणाऱ्या पिंकी जोशी नामक महिला ३ ऑक्टोंबर रोजी त्यांच्या सोन्याच्या तीन चैन दुरुस्तीसाठी बाजारात गेल्या होत्या. ज्वेलर्सच्या दुकानांमध्ये त्यांनी दोन चैन दुरिस्तीसाठी टाकल्या आणि तिसरी चैन दुरुस्त होणार नाही म्हणून त्यांनी ती त्यांच्या बॅगेमध्ये ठेवली होती. त्यानंतर त्या आर आर टी रोड येथे भाजी खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. खरेदी करत असताना त्यांच्या मुलाने बॅग खालून कट झाली असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी बॅग उघडून पाहिली असता बॅगेला खालून कट मारण्यात आल्याचे दिसले. बॅग कापून बॅगेत असलेली चैन ठेवलेले पाकीट दिसले नाही. ते त्यांनी बॅगेच्या इतर कप्प्यात शोधण्याचा प्रयत्न केला, पण ते आढळून आले नाही. तसेच आजूबाजूला रस्त्यावर शोधण्याचा प्रयत्न केला असता तिथेही दिसून आले नाही. त्यानंतर त्यांनी बॅगेची तपासणी केली असता कुणीतरी ब्लेडच्या साह्याने खालच्या बाजूस कापलेले आढळून आले. त्यावर कोणीतरी आपली पर्स चोरी करण्याच्या उद्देशाने बॅग कापली असल्याचे समजले. त्यानंतर दोन दिवसांनी पिंकी यांनी त्यांच्या पतीसह मुलुंड पोलीस ठाण्यात येऊन रीतसर चोरीची तक्रार दाखल केली.

# कोल्ड्रिंक्समध्ये गुंगीचे औषध देऊन रिक्षा चालकाला लुटणाऱ्या एकाला अटक

## नवघर आणि मुलुंड पोलिसांची संयुक्त कारवाई

■ होम टाइम्स टीम

कोल्ड्रिंकमध्ये नशा मिसळून रिक्षाचालकांसह इतर नागरिकांना लुटणाऱ्या टोळीचा मुलुंड आणि नवघर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर अन्य दोन आरोपींचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दोन अनोळखी प्रवाशांनी नारायण लिंगे नामक रिक्षा चालकाची ऐरोलीहून मुलुंडच्या म्हाडा सिग्नलकडे जाण्यासाठी रिक्षा पकडली. रिक्षा चालक लिंगे यांनी त्यांना रिक्षात बसवून रिक्षा ऐरोलीच्या दिशेने नेली असता रिक्षा खाडी किनारी येताच त्यांनी रिक्षा थांबविण्यास सांगितले आणि खाली उतरून पाणी व थंड पेय आणले. ते रिक्षा चालकाला पिण्यासाठी दिले. कोल्ड्रिंक पिऊन



रिक्षाचालक झोपी गेला. रिक्षा चालक झोपला असल्याचे पाहताच रिक्षात बसलेल्या दोघांनी रिक्षाचालकाची सोन्याची अंगठी व चार हजार रुपये काढून घेतले आणि ते दोघे घटनास्थळावरून पसार झाले.

जून महिन्यात हा गुन्हा घडला होता. दरम्यान असाच आणखी एक प्रकार मुलुंड पश्चिम येथेही उघडकीस आला होता. या दोन्ही घटनेनंतर नवघर पोलीस आणि मुलुंड पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे नुकतेच ४२ वर्षीय शरद नामक एका आरोपीला कल्याण येथून अटक केली. तर त्याचा दुसरा साथीदार गुजरातमध्ये लपून बसला असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांकडून त्याचाही शोध सुरू केला आहे.




जसराज ॲन्टिक ®



सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)

सणासाठी विशेष ऑफर

10% to 40% डिसकाउंट

१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल ✦ कुंदन ✦ नेकलेस सेट
पेटेंड ब्युटी लॉंग सेट ✦ चंदनहार ✦ दागिने ✦ जवपतला गोल्ड ✦ रोडियम ब्रेसलेट ✦ चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे

नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर

सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट

Note: Before coming pl buzz on Cell.

CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा



## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक




आरोग्य आशा

डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

## प्रुरिटस (कोरड्या त्वचेला खाज सुटणे)

## रजोनिवृत्ती दरम्यान...

औषधाशिवाय उपचार– ३





**हार्मोन्सची पातळी कमी झाल्यामुळे त्वचा कोरडी, सैल, पातळ होते आणि चेहऱ्यावर जास्त केस दिसतात आणि टाळूवर केस कमी होतात.**

*ही एक कोरडी खाज सुटणारी त्वचा स्थिती आहे, जी बऱ्याच स्त्रियांना त्यांच्या रजोनिवृत्तीच्या काळात प्रभावित करते. चांगली बातमी अशी आहे की, या सुंदर त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेक नैसर्गिक पर्याय आहेत.*

### खाज सुटणारी त्वचा आणि रजोनिवृत्ती–हार्मोन्स कनेक्शन

*स्त्री पुनरुत्पादक संप्रेरक, इस्ट्रोजेन, शरीरातील कोलेजन, शरीरातील तेल जे त्वचा ओलसर आणि लवचिक ठेवते, निर्मितीला चालना देण्यासाठी जबाबदार आहे. प्री–मेनोपॉज आणि रजोनिवृत्तीच्या अवस्थेत, इस्ट्रोजेनची पातळी कमी होते. ज्यामुळे शरीरातील कोलेजन आणि तेल कमी होते, ज्यामुळे त्वचेला कोरडेपणा आणि खाज सुटते.*

### उपचार पद्धती

*आमच्या 'मोनिषाज मंत्रा' मध्ये आम्ही अनेक स्त्रियांना रजोनिवृत्तीच्या काळात त्यांच्या कोरड्या, खाज सुटलेल्या त्वचेच्या स्थितीवर मात करण्यासाठी खालील मार्गांनी मदत केली आहे, तीही औषधांशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय.*

- *व्हिटॅमिन सी आणि ओमेगा–३ फॅटी ॲसिडस् समृध्द निरोगी आहार घ्या, तसेच फळे, सॅलड, हिरव्या भाज्या, अंकुरलेले धान्य, फ्लेक्स बियाणे, बाजरीचे २–३ सर्व्हिंग खा. प्रक्रिया केलेले अन्न आणि शुद्ध साखर टाळणे.*
- *कॅफिन आणि अल्कोहोलचे सेवन कमी करणे, कारण ते त्वचेचे निर्जलीकरण करतात.*
- *गरम पाण्याने अंघोळ करणे टाळा, कारण यामुळे शरीरातील नैसर्गिक तेल नष्ट होते.*
- *पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या.*
- *दररोज १२–१४ ग्लास पाणी प्या.*
- *दररोज वेगवान चालणे, योगासने, प्राणायाम, स्मित ध्यान यांचा सराव हार्मोन्सचे नियमन आणि निरोगी राहण्यास मदत करते.*

## सुजोक थेरपी




- *मॅग्नेट थेरपी – इंडेक्सच्या बाहेरील भागावर चिकट टेपवर बार मॅग्नेट आणि हाताच्या करंगळीवर दररोज २ तास लावणे. (चित्र १ प्रमाणे)*

- *एक्यूप्रेशर– हाताच्या तळव्यावर अंडाशय आणि गर्भाशयाशी संबंधित बिंदूंना अंगठ्याने किंवा बोटांनी दिवसातून चार वेळा एका मिनिटासाठी मालिश करा .*




(चित्र २ प्रमाणे)

**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक :**

१. ऑनलाइन–सुजोक Six Ki-1 (Level-III) ११ ते २३/१०/२०२३, २. निवासी, मेरिडियन सुजोक Ki (Level-II) २७ ते २९/१०/२०२३

•Limited Seats Registration on First Cum First Basis.


**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**

M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times

Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.

**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**




सुनिता देसाई


## आरोग्य आणि मनोरंजन

## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

७ ऑक्टोबर २०२३ ते १३ ऑक्टोबर २०२३


*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल अ‍ॅन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन अ‍ॅक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*


**संपर्क :** ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com



**मेष** (अ, ल, इ)
तुमचे सर्व प्रिय आणि जवळचे लोक तुम्हाला स्वीकारतील. कोणीतरी तुम्हाला छान मदत करेल. **सल्ला:** सर्व ज्ञात आणि अनोळखी लोकांशी मैत्रीपूर्ण वागण्याचा प्रयत्न करा. नम्र व्हा आणि वृद्ध लोकांना मदत करा. तुमच्या स्मरणशक्तीकडे लक्ष द्या.




**कर्क** (ड, च, ह)
तुम्हाला काही कठीण परिस्थितीचा सामना करावा लागेल. निरुपयोगी गोष्टींवर पैसा खर्च कराल. **सल्ला:** आशावादी आणि सामाजिक आणि निस्वार्थी व्हा. पक्षी आणि प्राण्यांना चारा. अंतर्दृष्टीकडे लक्ष द्या.




**तुळ** (र, ट)
तुम्ही अगदी लहान अनुभवाने नकारात्मक व्हाल. तुमची सहावी इंद्रिय तुम्हाला मदत करेल. **सल्ला:** छोट्या गोष्टींवर जास्त विचार करू नका. इतरांच्या जबाबदाऱ्या घेऊ नका. भीती आणि जगण्याकडे लक्ष द्या.




**मकर** (ख, ज)
तुमचे ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला या आठवड्यात खूप मेहनत करावी लागेल. **सल्ला:** गरजूंना काही रोख दान करा. इंडिगो रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या प्रेमाकडे आणि काळजीकडे लक्ष द्या.




**वृषभ** (ब, व, य)
विश्वासू लोकांकडून पाठिंबा मिळणार नाही. नियोजनापेक्षा परिस्थिती अधिक शक्तिशाली असेल. **सल्ला:** त्वरीत निर्णय घ्या आणि त्वरित कृती करा. वेळ आणि परिस्थिती जशी आहे तशी पाळण्याचा प्रयत्न करा. नवीन संबंधांकडे लक्ष द्या.




**सिंह** (म, ट)
तुम्हाला अज्ञात व्यक्तीकडून काही मदत मिळेल. तुम्हाला काही चांगली बातमी मिळेल. **सल्ला:** तुम्ही अधिक सक्रिय असणे आवश्यक आहे. लक्ष द्या आणि तुमच्या ध्येयावर योग्य लक्ष केंद्रित करा. तुमच्या वैश्विक ऊर्जेकडे लक्ष द्या.





**वृश्चिक** (न, य)
तुम्ही काही उद्देशाने प्रवास करू शकता. काही उच्चभ्रू व्यक्तींशी तुमची भेट होईल. **सल्ला:** तुमची कौशल्ये आणि क्षमता वापरा. आपल्या सामाजिक स्वभावाचा योग्य वापर केला पाहिजे. आपल्या सामर्थ्याकडे लक्ष द्या.





**कुंभ** (ग, स, श)
हा आठवडा तुमच्यासाठी चांगला आहे आणि तुम्हाला अनेक समस्यांचे निराकरण मिळेल. **सल्ला:** रस्ता ओलांडताना आणि बोलताना काळजी घ्या. हिरव्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या कामाकडे लक्ष द्या.





**मिथुन** (क, च, ज)
आपल्या मौलिकता आणि लवचिकतेसह आनंदी व्हाल. कोणीतरी फसवणूक करण्याचा प्रयत्न करेल. **सल्ला:** तुमचा अनुभव तुमच्या शिक्षकांना लक्षात राहील. भावना आणि शक्ती स्थिर राहील. तुमच्या गुंतवणुकीकडे लक्ष द्या.




**कन्या** (प, ठ, ण)
तुमचे हितचिंतक काही सल्ला देतील आणि तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. **सल्ला:** आपल्या निराशेवर मात करण्यासाठी, आपण नम्र असणे आवश्यक आहे. स्वार्थी आणि उतावीळ होऊ नका. थांबा आणि पहा. तुमच्या आनंदाकडे लक्ष द्या.




**धनु** (भ, ड, फ, ट)
तुमचा लोभ तुमच्या आनंद आणि सुसंवादाच्या मार्गात अडथळा बनेल. **सल्ला:** पक्षी आणि प्राण्यांना चारा. राखाडी रंगाच्या गोष्टी वापरा. आपल्या दयाळूपणाकडे लक्ष द्या.




**मीन** (द, च, झ)
या आठवड्यात पैशाची चढउतार आहेत आणि काही नको असलेल्या गोष्टी आहेत. **सल्ला:** घाई हा कचरा आहे म्हणून सावकाश जा. वस्तू पिवळ्या रंगात वापरा. तुमच्या विश्वासाकडे लक्ष द्या.

# नवघर पोलिसांनी २५ तोळे सोन्याचे दागिने दोन तासात शोधून काढले

## महिला रिक्षात विसरली होती मुलीच्या लग्नाचे दागिने

■ **होम टाइम्स टीम**

**मुलुंड नवघर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्य तत्परतेमुळे दोन तासात रिक्षामध्ये हरवलेले सोन्याचे २५ तोळे दागिने तक्रारदाराला परत करण्यात यश आले आहे. पोलिसांच्या या कामगिरीमुळे नवघर पोलिसांवर सर्वत्र कौतुकांचा वर्षाव केला जात आहे.**



याबाबतचे वृत्त असे की, रविवारी पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील, ठाणे अंमलदार कर्तव्यावर असताना वसंती माधवन नादार नामक महिला यांनी पोलीस ठाण्यात येऊन पोलिसांना समगितले की त्या रविवारी सकाळी गव्हाणपाडा सिग्नल ते मुलुंड स्टेशन असा रिक्षाने प्रवास करीत असताना त्यांच्या जवळ असलेल्या बॅगेत त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी खरेदी केलेले सोन्याचे २५ तोळ्याचे दागिने व इतर महत्वाचे कागदपत्रे असलेली बॅग ते रिक्षातून उतरताना विसरल्या. हा प्रकार मुलुंड रेल्वे स्टेशन जवळ उतरल्यानंतर लक्षात आल्याने त्या तात्काळ नवघर पोलीस ठाण्यात आलाय आणि अतिशय कळवलीने व रडून मुलीच्या लग्नासाठी बनविलेले २५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने रिक्षात विसरले असल्याचे पोलिसांना सांगितले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन संदीप पाटील यांनी सदर बाब लागलीच वरिष्ठ अधिकारी आणि गुन्हे प्रकटीकण पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक धाडवे, पोलीस उपनिरीक्षक सानप, पथक त्याच बरोबर पोलीस उपनिरीक्षक नाळे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत यांना सांगितले असता नमूद पथकाने मुलुंड पूर्व परिसरातील अतिशय बारकाईने सीसीटीव्ही फुटेज तपासून सबंधित रिक्षा क्रमांक प्राप्त करून त्यावरून रिक्षा चालकाचा शोध घेतला आणि महिलेचे हरवलेले २५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने तिला परत केले.

नवघर पोलिसांनी दोन तासात या रिक्षाचालकाचा शोध घेतला आणि तांत्रिक माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर त्याचा शोध घेण्यात यश मिळवले. पोलिसांच्या या कामगिरी बद्दल सर्व तपास पथकाच कौतुक केले जात आहे.

# क्रिप्टोकरन्सीच्या नावे मुलुंडकराची नऊ लाखांची फसवणूक, गुन्हा दाखल

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड पूर्वेला राहणाऱ्या एका नागरिकाची क्रिप्टोकरन्सीच्या बहाण्याने नऊ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याची घटना मुलुंडमध्ये उघडकीस आली आहे. नवघर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४३ वर्षीय अश्फाक खान हे नाहूर येथील रहिवासी आहेत. पाच वर्षांपूर्वी त्यांची ओळख इंद्रभूषण चौधरी नामक व्यक्तीसोबत खाली. तो बोरिवली पूर्व येथील रहिवासी होता. इंद्रभूषण याने अश्फाक खान यास क्रिप्टोकरन्सी आणि फॉरेक्स ट्रेडिंगबाबत माहिती दिली आणि त्यात पैसा गुंतवल्यास जास्त लाभ होईल असे आमिष दाखविले. १० जून रोजी त्याने अश्फाक यास सांगितले की, क्रिप्टोकरन्सीमध्ये एक लाख रुपये गुंतावल्यास आठ दिवसांत एक लाख २५ हजार रुपये कमावण्याची चांगली संधी आहे असे सांगितले. हे ऐकून अश्फाक यांनी इंद्रभूषणच्या बोलण्यावर विश्वास ठेवला आणि कोणताही विचार न करता मित्रांकडून पैसे घेतले आणि एक लाखाऐवजी दोन लाख रुपये गुंतवले. पहिल्या गुंतवणुकीनंतर, इंद्रभूषण याने तक्रारदाराला दररोज नवीन ऑफर आणि नवीन प्रलोभने देण्यास सुरुवात केली. त्यामुळे त्याने वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये इंद्रभूषणला गुंतवणुकीचे नऊ लाख रुपये दिले होते. मात्र अनेक दिवस उलटूनही इश्फाक यांना त्यांचे पैसे परत न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी नवघर पोलीस ठाणे गाठून पोलिसांना घटनेची माहिती दिली. इंद्रभूषण चौधरी यांच्या सांगण्यावरून आतापर्यंत नऊ लाख रुपये गुंतवणुकीसाठी दिल्याचे अश्फाक यांनी पोलिसांना सांगितले. त्यानंतर नवघर पोलिसांनी इंद्रभूषण चौधरीविरुद्ध भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# मुलुंडमधून दोन अल्पवयीन मुले बेपत्ता

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड परिसरातील दोन अल्पवयीन मुले अचानक घरातून निघून गेल्यामुळे मुलुंडमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरातून गेलेल्या या दोन मुलांसोबत नेमके काय झाले? ते स्वतःच्या मर्जीने घर सोडून गेले का? या दोघांचे कुणीतरी अपहरण केले का? अशी उलटसुलट चर्चा येथे ऐकायला मिळत आहे. त्यामुळे मुलुंड पोलीसही या मुलांचा शोध घेत आहेत.

मुलुंड मध्ये राहणारा १६ वर्षीय मंथन आणि १४ वर्षीय सोहम नामक दोन अल्पवयीन मुले घरातून कॅसिओ आणण्यासाठी दुकानात जातो असे सांगून बेपत्ता झाले आहेत. या दोघांनी रेल्वे स्टेशन परिसरातील दुकानांमध्ये आम्ही वस्तू खरेदी करत आहोत असे घरात सांगितले होते. त्यानंतर ३ ऑक्टोंबर रोजी दुपारी घरातून निघालेले हे दोघेजण ५:००वाजेपर्यंत घरी पोहोचले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या मित्रांच्या घरी फोन केला. त्यावेळी त्यांना ते दोघे सीएसटी येथे कॅसिओ खरेदी करण्यासाठी गेले असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्या दोघांनी घरच्यांशी कुठलाही संपर्क केला नव्हता. त्यांच्याकडे मोबाईल देखील नव्हता. त्यामुळे ते नेमके कुठे आहेत? याची माहिती त्यांच्या घरच्यांना मिळत नव्हती. रात्रीचे ८:०० वाजले तरी ते घरी पोहोचले नव्हते. त्यानंतर ते पुण्यात शेजाऱ्यांच्या किंवा नातेवाईकांच्या घरी गेले आहेत का? याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी घेतली. परंतु दोघांच्या घरी कुठलीच माहिती मिळवून आली नाही. अखेर १०:३० नंतर त्यांच्या कुटुंबीयांनी मुलुंड पोलीस ठाण्यात धाव घेतली आणि हे दोघे घरी परत आले नसल्यामुळे कोणीतरी त्यांचे अपहरण केले असावे अशी तक्रार दिली. मुलुंड पोलिसांनी तपासाचे गांभीर्य लक्षात घेऊन या दोन मुलांचे फोटो घेऊन या प्रकरणाची गंभीर दखल घेत अपहरणाचा गुन्हा दाखल केला. सध्या पोलीस दोघांचाही शोध घेत आहेत.

CALL CENTER
022 66211333

E-MAIL ID
customerservice@homenet.net

FACEBOOK MESSENGER
HomeNet / @homenet.net

**Facebook Messenger Scan Code**: To get in touch, simply scan a code using the Messenger app.

HOME NET
www.homenet.net

WOW!
DOUBLE MAZZA!! uploads & downloads at same speed, since 2010 now @ ₹194/-*
Pay for 6 Months & Get Additional 7 Months Free
67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME
- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

67 OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

HOME FIBER powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

## HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps

** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS INTRODUCTORY OFFER IN YOUR SOCIETY PLEASE COME TO US WITH A MINIMUM GROUP OF 15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store | GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**